# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २८०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०१/०६/२०१८

**१) विवाहीतेला शारीरिक व मानसिक त्रास दिल्याने गुन्हा नोंद :-**

१० वर्षा पुर्वी पासुन ते आज पर्यत यातील फिर्यादीला १० वर्षा पासुन तीचे चरीत्र्यावर संशय घेवुन शारीरिक व मानसिक त्रास दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व महिला व मुलीकरीता सहायता कक्ष पो. मु. भंडारा यांचे लेखी अहवाला वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४९८(अ) भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन विट हातात घेवुन डोक्यावर मारुन दुखापत केल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक ३१/०५/२०१८ चे ०८.०० ते ०८.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी राम आत्माराव डोंगरवार वय ६३ वर्ष, रा. उमरी ह. मु. प्लॉट न ६ डायमंट गृह निर्माण संस्था टेलीफोन नगर दिघोरी याने सन १९९५ मध्ये यातील आरोपीचे वडीलांकडुन गट क्र. ५९/११ प्लॉट नं. १८ विकत घेवुन त्याने रजिस्ट्री केली आहे ती रजिस्ट्री आरोपीतांना अमान्य असल्याने घटने वेळी फिर्यादी सेंदुरवाफा गावचे रोडनी मोटार सायकल क्र. एमएच ३१ डीपी ७३२२ ने जात असता यातील आरोपी क्र. १ याने थांबवुन आरोपी क्र. २ यास बोलावुन दोघांनी संगनमत करुन इसको फलका दो असे म्हणुन आरोपी क्र. १ याने बाजुची विट हातात घेवुन फिर्यादीचे डोक्यावर मारुन दुखापत केल्याने फिर्यादी यांचे बयाण व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३४१,३२४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) सोन्याचे दागीणे व नगदी पैश्याची चोरी :-**

दिनांक ३०/०५/२०१८ चे चे रात्र दरम्यान यातील फिर्यादी सौ. चंपा विष्णु पुस्तोडे ही भाळयाचे घरात राहत असुन ती स्वगावी गेली असता तिचे किरायाचे खोलीचे समोरील दरवाज्याचा कोणीतरी अज्ञात चोराने ताला तोडुन आत प्रवेश करुन घरातील लाकडी आलमारीचा ताला तोडुन आलमारीत ठेवलेले गळयातील लाखेचे ४० मनी वजन ४ ग्रॅम, कानातील सोन्याचे २ झुमके वजन ४ ग्रॅम, सोन्याचे तुकडे वजन ३ ग्रॅम, १ सोन्याची अंगठी वजन २.५ ग्रॅम, कानातील सोन्याची बुंदे वजन ४.५ ग्रॅम, व नगदी ३,०००/–रु. असा एकुण २४,५००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**४) लॅपटॉपची चोरी :-**

दिनांक २२/०५/२०१८ ते ३०/०५/२०१८ चे २१.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा वरील ठिकाणी रुम करुन राहत असुन त्याचेकडे असलेल्या एचपी पॅव्हेलीयन ९–६–१२०० टिएक्स चा लॅपटॉप किंमती १५,०००/–रु. टिएक्स चा लॅपटॉप किंमती १५,०००/–रु. चा खुल्या कपाटात ठेवला असता तो कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादी गौरव अशोक वासनिक वय २६ वर्ष, रा. मानेगाव सडक ह.मु. योगेश मुंडले रा. ग्रामसेवक कॉलोनी भंडारा उमाटे कॉलेज जवळ यांचे घरी भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक ३१/०५/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही आयटीआय कॉलेज तुमसर येथे जाते म्हणुन घरुन निघुन गेली परंतु सायंकाळी घरी परत न आल्याने तिला कोणीतरी अज्ञात ईसमाने फुस लावुन पळवुन नेले असावे असा संशय दर्शविल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

६) **जनावरांना भरुन निदर्यतेने वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ३१/०५/२०१८ चे ०३.१० वाजता दरम्यान यातील आरोपीने त्याचे ताब्यातील पांढऱ्या रंगाच्या बोलेरो पिकअप गाडी बिना नंबर ची व्हीलर मध्ये ३ म्हैसी व २ हेले(रेडे)किंमती ७५,०००/–रु. चे जनावरांना दाटीवाटीने भरुन निदर्यतेने वाहतुक करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी हिरालाल लांगडे यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ११(१)(ड)(ई)प्रा. वा. प्र.अधी. सहकलम ८३ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. बोरकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

७) **इसमाचा मृत्यु :–**

दिनांक ३१/०५/२०१८ चे १२.२५ वाजता दरम्यान यातील मृतक श्रावण मन्साराम शेंडे वय ५८ वर्ष, रा. कनेरी/ केसोरी जि. गोदिंया पो. स्टे केसोरी (न्यायालयीन कैदी) याची सामान्य रुग्नालय भंडारा येथे दिनांक ३१/०५/२०१८ चे १२.२५ वा दरम्यान तपासनी व औषधोपचार करीत असतांना डॉ. ने तपासुन मृत घोषीत केल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. शेळके यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. बोरकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

८) **इसम मृत अवस्थेत मिळुन आला :–**

दिनांक ३०/०५/२०१८ ते ३१/ ०५/२०१८ चे रात्र दरम्यान यातील मृतक यशवंत पुरुषोत्तम बरीये वय ४५ वर्ष, रा. कोरंभी देवी हा दिनांक ३०/०५/२०१८ चे सकाळी भंडारा येथे जुते चप्पल शिवण्याचे काम करण्यास गेला होता तसेच रात्री २०.०० वाजता दरम्यान घरी परत आला दिनांक ३१/०८/२०१८ ला शेजारील लोकांना वास येत असल्याने घरात बघीतल्यावर मृतक हा खाटेवर मृत अवस्थेत घटना स्थळी दिसुन आल्याने फिर्यादी प्रविण नरेन्द्र मेश्राम वय २७ वर्ष, रा. कोरंभी देवी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

९) **गळफास लावुन युवकांचा मृत्यु :–**

दिनांक ३१/०५/२०१८ चे ११.३० वाजता दरम्यान यातील मृतक बबलु उर्फ हितेश आनंदरव नंदागवळी वय २८ वर्ष, रा. झरप याने स्वत:चे घरी मयालीला नॉयलॉन दोरीने गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी कुमार लहानुजी नंदागवळी वय ५४ वर्ष, रा. झरप यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कोल्हे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

१०) **इसम मृत अवस्थेत मिळुन आला :–**

दिनांक ३०/०५/२०१८ चे १२.०० ते ३१/०५/२०१८ चे ०६.०० वाजता दरम्यान यातील मृतक सिताराम केशव सराटे वय ५५ वर्ष, रा. सालेबर्डी हा कवडसी फाटा येथील पान ठेल्याचे बाजुला मृत पावलेल्या अवस्थेत मिळुन आल्याने याने फिर्यादी विनोद केशव सपाटे वय ४० वर्ष, रा. सालेबर्डी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

११) **मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ३१/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ३५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेंली असून तीन सिटर वाहनाकरीता– ०१ ईतर वाहनांवरती – ३४ केसेस करण्यात आले आहे.

**(मपोउपनि.प्रणती लांजेवार)**
**माहिती कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता. कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.